सं.फौ.ख.–१२०७/२०२२

नि.क्र. १०

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – जनार्धन बाबुराव हिवाळे

वय – ५४ वर्षे,

व्यवसाय – मजुरी

राहणार – कोंढवड, ता. राहुरी जि.अ.नगर

**<u>सरतपासणी – सहा.सरकारी अभियोक्ता श्री.आर.के.गागरे</u>**

१. दि.१८/०८/२०२२ रोजी मला राहुरी पोलीस ठाण्यामध्ये बोलाविले होते. त्यावेळी पोलीसांनी माझी पंचनाम्यावर सही घेतली. पंचनामा कुठला होता हे मला माहीत नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. सदरच्या पंचनाम्यावरील अनुक्रमांक २ वरील सही माझी आहे. सदर पंचनाम्यातील मजकूर मला पोलीसांनी वाचून दाखविला नाही व मी सुध्दा वाचला नाही. सदर पंचनाम्यावरील सहीला **<u>नि.११</u>** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोगपक्षाच्या बाजूने साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि १८/०८/२०२२ रोजी पोलिसांनी मला पोलीस स्टेशन येथे बोलवले होते. त्यावेळी पोलिस स्टेशनच्या आवारात लावलेली लाल रंगाची करीश्मा मोटार सायकल क्र. MH16 AX4044 व एक पांढ–या रंगाची पिक अप बोलेरो क्र. MH11BL5302 हे वाहन नुकसानग्रस्थ अवस्थेत असलेले दाखवले व ते तांत्रिक तपासणीकामी जप्त केले. सदरचा जप्ती पंचनामा मला वाचून दाखवला व त्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपी तर्फे उलट तपास विधीज्ञ आर. डी. बाचकर यांच्यामार्फत</u>**

**<u>आरोपींनी उलटतपास नाकारला.</u>**

फेरतपास नाही.

PANKAJ HILAL PATIL Digitally signed by PANKAJ HILAL PATIL Date: 2026.02.02 10:34:08 +0530

राहुरी

दिनांक – २१/०१/२०२६.

**(श्री. पा. एच. पाटाल)**

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,

न्यायालय क्र.२,राहुरी